"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

॥ यथा देवो तथा गुरौ ॥

मूल्य रु. ५

क्रमांक ४ वर्ष : ३७ जानेवारी-मार्च २०१६

BOOK PACKET (PERIODICAL)
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

TO,

From : The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंच - सस्नेह मेळावा व तिळगुळ समारंभ

**स्थळ** : सहयोग मंदिर हॉल,
सहयोग मंदिर मार्ग,
विष्णू नगर, नवपाडा, ठाणे (प.)

**तारीख** : रविवार २४ जानेवारी २०१६, संध्याकाळी ४ ते ८

### कार्यक्रम

- ठाणे मंच यंदा २० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. संस्थेचे वधूवर सूचक मंडळ अविरतपणे सारस्वत समाजाची सेवा करीत आहे. यानिमित्त आमच्या मंडळात काम केलेल्या सर्व भगिनींचा सत्कार.
- मनोरंजनासाठी एक सांस्कृतिक कार्यक्रम
- मंडळातर्फे विवाह झालेल्या जोडप्यांचे खास स्वागत
- तिळगुळ समारंभ (सर्वांसाठी)

हेच आमंत्रण समजून सर्वांनी वेळेवर हजर राहणे.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**सुरेश पालेकर** ९९६९४५५३७०
**मंजिरी कुलकर्णी** ९६६५०९८११७

**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**
**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**
Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**
**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.), Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

**मकरसंक्रांतीचा हळदी कुंकू समारंभ – भगिनींस आमंत्रण**

**तारीख शुक्रवार १५ जानेवारी, संध्याकाळी ५ ते ७**

**स्थळ :** माटुंगा मित्र मंडळ, एफ ४, कर्नाटक बिल्डींग, मोगल लेन, माहीम

आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून लेकीसुनांसह अवश्य उपस्थित राहावे.

कार्यकारिणीतर्फे

**सौ. किशोरी अ. वागळे** **सौ. नीलिमा श. नाडकर्णी**

## संपादकीय

### एशियाटिक सोसायटीच्या वर्धापनदिनी सन्मानित केलेल्या पाच संशोधकांमध्ये डॉ. नरेन्द्र वागळे यांचा समावेश

प्राच्यविद्या संशोधन व दुर्मिळ दस्तैवजांचे व पुस्तकांचे संग्रहालय या क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटवणारी 'एशियाटिक सोसायटी' म्हणजे मुंबईचे एक भूषण. दोनशेहून अधिक वर्षांची परंपरा असलेली ही संस्था वेळोवेळी व्यासंगी संशोधकांना 'ऑनररी फेलोशिप' देऊन सन्मान करते. या संशोधकांमध्ये भारतरत्न म.म.पां.वा. काणे, आर. जी. भांडारकर, गो. स. सरदेसाई, दुर्गाबाई भागवत इत्यादी विद्वानांचा समावेश आहे. यावरून या सन्मानाची प्रतिष्ठा लक्षात येते. अलीकडेच सोसायटीच्या २१२ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने २६ नोव्हेंबर रोजी एका विशेष सोहळ्यात पाच विद्वानांचा सत्कार करण्यात आला. त्यांतील एक म्हणजे कॅनडास्थित इतिहासतज्ज्ञ व प्राच्यविद्या अभ्यासक डॉ. नरेन्द्र काशिनाथ वागळे. ज्ञातीतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

फ्रेंच ब्रीजजवळील राघववाडी येथे राहणारे वकील कै. काशिनाथ गणपत वागळे व कै. मंजुळा यांचे नरेन्द्र हे ज्येष्ठ चिरंजीव. जन्म १९३६. शालेय शिक्षण आर्यन हायस्कूल, गिरगांव येथे. पण एका वर्षासाठी ते कारवार येथील हिंदू हायस्कूलमध्ये होते व अस्मादिकांचे वर्गमित्र होते. सेंट झेवियर्स कॉलेजमधून इतिहास विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यावर त्यांना लंडन विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळाला व तेथूनच ते पी.एच्.डी. झाले. कॅनडा येथील टोरंटो विद्यापीठात त्यांनी ३६ वर्षे अध्यापन केले व २००२ साली निवृत्त झाले. त्यांच्या असामान्य योगदानाचे कौतुक-स्मारक म्हणून त्याच साली न्यू कॉलेज, टोरंटो येथे साऊथ एशियन स्टडीज या विषयातील विद्यार्थ्यांमध्ये सर्वप्रथम येणाऱ्यास प्रतिवर्षी 'Annual Prof. Narendra Wagle Scholarship' देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली.

**१ जानेवारी २०१६**



### विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना वार्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती जयश्री | व | श्री जयंत भास्कर कसबेकर | वाळकेश्वर |
| श्रीमती ज्योत्स्ना | व | श्री जगदीश दिगंबर कुलकर्णी | बोरीवली |
| श्रीमती सीमा | व | श्री नागेश मंगेश मुझुमदार | दादर |
| श्रीमती शांता | व | श्री अरविंद नारायण नाडकर्णी | सांताक्रुझ |
| श्रीमती गिरीजा | व | श्री शंकर गजानन नाडकर्णी | पुणे |
| श्रीमती शरयू | व | श्री दत्तात्रय नागेश नाडकर्णी | पारले |
| श्रीमती पुष्पा | व | श्री श्रीपाद शांताराम पालेकर | नवी मुंबई |
| श्रीमती विजयालक्ष्मी | व | श्री रामचंद्र राव | कांदिवली |
| श्रीमती उमा (नीला) | व | श्री मंगेश शामराव वागळे | ठाणे |

### ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| दामोदर श्रीपाद बोरकर, | अंधेरी | मुक्ता हरीष कुलकर्णी, | पेडर रोड |
| सुरेश भवानीशंकर देसाई, | कांदिवली | स्मिता प्रकाश मुझुमदार, | वांद्रे |
| विजया दत्तात्रय देसाई, | जोगेश्वरी | सुहासिनी सदानंद नाडकर्णी, | माहीम |
| रजनी मंगेश देसाई, | अंधेरी | सिंधू रामदास नाडकर्णी, | गोरेगांव |
| अशोक वेंकटराव दिवेकर, | दहिसर | अलका अनिल फेणाणी, | ग्रांट रोड |
| सुचेत्रा सुधाकर दिवेकर, | पारले | पुष्पा श्रीपाद पालेकर, | नवी मुंबई |
| हेमलता सुरेश दास्ताने, | ठाणे | अरुण हणमंत सुखटणकर, | बोरीवली |
| मेधा (उषा) विश्वनाथ गुंजीकर, | पुणे | शुभदा गोविंद तेलंग, | माहीम |
| दयानंद श्रीनिवास गायतोंडे, | बोरीवली | मंगेश मर्तोबा तेलंग, | दादर |
| मंगेश गणपती गायतोंडे, | बोरीवली | विलास पांडुरंग वाघ, | माहीम |
| विनोद भवानीशंकर गायतोंडे, | बोरीवली | कमल गोपीनाथ वाघ, | दादर |
| प्रकाश त्रिंबक कुलकर्णी, | ठाणे | आशा शंकर वागळे, | वांद्रे |

## प्रकाश झोत

### संघाचा सहस्रपूर्ण चंद्रदर्शन सोहळा जोगेश्वरी येथील श्रीरामेश्वर मंदीर येथे संपन्न

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात नमूद केल्याप्रमाणे संघाची स्थापना १० नोव्हेंबर १९३५ रोजी झाली होती. तो दिवस तिथीप्रमाणे कार्तिक पौर्णिमा अर्थात् त्रिपुरारी पौर्णिमा हा होता. संघाच्या यशस्वी वाटचालीला तिथीप्रमाणे बुधवार २५ नोव्हेंबर रोजी त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी ८० वर्षे पूर्ण झाली. तेव्हां सहस्रपूर्ण चंद्रदर्शनाच्या निमित्ताने मुंबई येथील प्रतिमंगेशी असें समजल्या जाणाऱ्या जोगेश्वरीच्या सरस्वती बागेतील रामेश्वर मंदिरात समस्त ज्ञातिबांधवांच्या कल्याणाप्रीत्यर्थ श्रीमंगेशाकडे संघातर्फे गाऱ्हाणे घालण्यात आले.

संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी विश्वस्त श्री. प्रणव मुझुमदार यांच्या विनंतीनुसार संघाचे कार्याध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी व मुखपत्रिकेचे संपादक श्री. दत्तात्रय नाडकर्णी यांना दीपप्रज्वलन करण्याचा पहिला मान मिळाला. नंतर इतरांनी दीपप्रज्वलन केले. देवालय, प्राकार, दीपस्तंभ, कुंपणाची भिंत व इतर परिसर येथे असंख्य पणत्यांची रोषणाई केली होती. हे दृष्य खरोखरच विलोभनीय होते. शेकडो भक्तगणांच्या उपस्थितीमुळे तेथे जत्रेचे स्वरुप आले होते व हे स्थळ म्हणजे प्रतिमंगेशी आहे याची पुन्हा एकदा प्रचीती आली. रात्री बरोबर ९ वाजता श्रीची देवालयाभोवती पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. त्यावेळी भजन मंडळी, हिलामतदार, जोतकार, पालखी वाहणारे हे सगळे सरस्वती बागेतील उत्साही रहिवाशीच होते. मिरवणुकीच्या मार्गावर सद्भक्ती मंदीर येथे पहिले पेणे घेतल्यावर दारोदारी रहिवाशांनी अर्पण केलेली काणूक स्वीकारून पालखी देवालयात आली. त्यानंतर घंटानादाने रीतसर आरती झाली. ते झाल्यावर मंदिरातील पुजाऱ्यांनी कार्याध्यक्ष श्री. नाडकर्णी यांच्या उपस्थितीत वर नमूद केल्याप्रमाणे गाऱ्हाणे घातले. देवस्थानतर्फे प्रसाद व संघातर्फे अल्पोपाहार झाल्यावर या प्रसन्न सोहळ्याची सांगता झाली.

### रूपा फेणे कुडवा यांची रिझर्व्ह बँकेच्या संचालकपदी संभाव्य निवड व विशाखा पालेकर मुळ्ये यांची आयसीआयसीआय बँकेच्या बोर्डावर पदोन्नती

१५ जानेवारी २०११ रोजी संघाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाच्या अंतर्गत ज्ञातींतील व्यवस्थापन क्षेत्रातील दोन अत्यंत कर्तबगार महिलांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता. त्या महिला होत्या रूपा फेणे कुडवा व विशाखा पालेकर मुळ्ये. उभयतांच्या कर्तृत्वाचा आलेख त्यानंतरही चढताच राहिला आहे.

नोव्हेंबर २००९ मध्यें 'बिझिनेस टुडे' या नियतकालिकात भारतातील २५ सर्वांत जास्त पॉवरफुल महिलांमध्ये रूपांचा समावेश केला होता. तेव्हा जानेवारी २०१० च्या मुखपत्रिकेच्या



अंकात त्यांचा परिचय करून दिला होता. त्यावेळी त्या 'क्रिसील' या उद्योगसमुहाची पत (रेटींग) ठरविण्याऱ्या कंपनीत एम्डी व सी.ई.ओ. या अत्युच्च पदावर होत्या. 'क्रिसील' सोडून त्या आता Omidyar Network India या कंपनीत कार्यकारी संचालक म्हणून काम करतात. सध्या रिझर्व्ह बँकेच्या बोर्डावरील ५ स्वतंत्र संचालकांच्या निवडीसाठी विविध क्षेत्रांतील १० ज्येष्ठ व अधिकारी व्यक्तींच्या नावांची चर्चा आहे. त्यांत रूपाच्या नावाचाही समावेश आहे. ऑस्कर अवॉर्ड देण्यापूर्वी चित्रपटांच्या व कलाकारांच्या नावांचा 'नॉमिनेशन'मध्ये समावेश होतो. हा समावेश होणे हे सुद्धा प्रतिष्ठेचे समजले जाते व वृत्तपत्रांत त्यांना प्रसिद्धीही मिळते. त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या संभाव्य संचालकांच्या नावांचीही चर्चा होते व तेसुद्धा प्रतिष्ठेचे ठरते. संभाव्य संचालकांच्या यादीत रूपाच्या नावाचीही चर्चा होणे हा सुद्धा त्यांच्या असामान्य कर्तृत्वाचा एक पुरावा आहे.

सुमारे ९ वर्षांपूर्वी 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम' या संस्थेतर्फे जगभरातून २५० व्यक्तींना 'यंग ग्लोबल लीडर' हा पुरस्कार देण्यात आला होता. त्या व्यक्तीची कामगिरी संपूर्ण जगावर प्रभाव पाडणारी असा एक निकष होता. त्याच वर्षी ॲस्पत इन्स्टीट्यूट, अमेरिका या संस्थेतर्फे भरीव प्रगती करतांना मूल्यांशी तडजोड न करणाऱ्या, नेतृत्त्व गुणांचा आदर्श समाजासमोर ठेवणाऱ्या भारतातील २५ निवडक व्यक्तींना 'इंडिया लीडरशिप इनीशिएटीव्ह'चा पुरस्कार देण्यात आला होता. त्याचप्रमाणे त्यावर्षी आय्.एम्.अे.च्या भारतातील उद्योग जगातील संस्थेने 'सी.एफ्.ओ. ऑफ द यिअर' हा पुरस्कार देण्यांत आला होता. हे सर्व पुरस्कार एकाच व्यक्तीला एकाच वर्षी मिळाले होते. ती कर्तबगार व्यक्ती म्हणजे अर्थशास्त्रातील यशस्वी महिला विशाखा पालेकर मुळ्ये, त्यांचा परिचय ऑगस्ट २००७ च्या मुखपत्रिकेच्या अंकात दिला होता. तेव्हां त्या आयसीआयसीआय या भारतातील सर्वात मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँकेत 'ग्रुप फायनॅन्शियल ऑफीसर' या पदावर होत्या. नंतर त्या ICICI Ventures या विभागाच्या प्रमुख झाल्या. आता त्यांना पदोन्नती मिळून त्या बोर्ड मेंबर झाल्या आहेत. त्यांच्याकडे 'होलसेल बँकींग' हे खाते आहे.

### कु. आर्या वर्टी भगवत्‌गीता पठणस्पर्धेत मुंबई पश्चिम उपनगरांत सर्वप्रथम

चिन्मय मिशन, पवई या सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षी गीता पठणाच्या स्पर्धा होतात. २०१५ सालच्या पठणासाठी १५ वा अध्याय होता. पारले येथे राहणारे श्री. रवीन्द्र गजानन वर्टी यांची कन्या कु. आर्या ही पारले टिळक विद्यालयाची विद्यार्थिनी. तिची वय वर्षे ७ ते ९ या वयोगटांत भाग घेण्यासाठी शाळेतून निवड झाली. वांद्रे ते अंधेरी या पश्चिम उपनगरांतील सर्व शाळांतील स्पर्धकांची १८ ऑक्टोबर रोजी विभागीय स्पर्धा झाली. त्यांत ती सर्वप्रथम आली.

२२ नोव्हेंबर रोजी भरलेल्या ज्ञातिसंमेलनामध्ये आपल्या एज्युकेशन सोसायटीने तिच्या प्रावीण्याचे कौतुक म्हणून तिला रोख बक्षीस दिले.

## वार्षिक स्नेहसंमेलन

दरवर्षीप्रमाणे यंदाही भरलेले आपल्या ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन २२ नोव्हेंबर २०१५ रोजी नेहमीप्रमाणे उत्साहात पार पडले. डॉ. अँटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्टचे सभागृह जवळजवळ पाचशे प्रेक्षकांनी तुडुंब भरले होते. प्रमुख पाहुणे म्हणून आयुर्वेद तज्ज्ञ वैद्य शैलेश नाडकर्णी हे सपत्नीक उपस्थित होते. त्यांचा परिचय मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात दिलेलाच आहे. यंदाच्या वर्षी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्राची देसाई यांनी उत्कृष्टपणे केले. नेहमीच्या प्रथेप्रमाणे व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. मुख्य कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी गतवर्षी निधन झालेल्या ज्ञातिबांधवांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्तब्धता पाळून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर ज्ञातीतर्फे प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देण्यात आले. सौ. स्वाती दिवेकर हिने प्रमुख पाहुण्यांच्या पत्नी सौ. देवकी नाडकर्णी ह्यांचे ओटी भरून स्वागत केले. संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी व एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांनी आपापल्या संस्थांच्या गेल्या वर्षीच्या ठळक घटनांचा आढावा घेतला. यानंतर श्री. शिरीष वाघ यांनी उपस्थितांना प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

प्रमुख पाहुणे वैद्य नाडकर्णी यांनी कोंकणी भाषेतून सहज सोप्या शैलीत आपले मोलाचे विचार मांडले आणि आयुर्वेदाचे महत्त्व पटवून दिले. आयुष्याचा वेद म्हणजे आयुर्वेद. आयुर्वेद म्हणजे संपूर्ण जीवनप्रणाली. ती कशी असते, आपल्याला मिळालेला हा मनुष्य जन्म पूर्ण आरोग्यदायी व यशस्वी कसा करायचा, कसे जगायचे याचे त्यांनी मार्गदर्शन केले. आजारी पडल्यावर औषधोपचार करणारे अनेक मार्ग आहेत. पॅथी आहेत. परंतु आजारी न पडण्यासाठी आपण कसे वागायला हवे, काय व कसे खायला प्यायला हवे, व्यायाम कसा करावा आणि आपले शारीरिक व मानसिक संतुलन कसे राखावे यावर त्यांनी मोलाचा सल्ला दिला व सर्वांच्या ज्ञानात भर घातली. 'स्वस्थस्य स्वास्थ रक्षणम्।' हा आयुर्वेदाचा पाया आहे. असे सांगून सर्वांना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक आरोग्य लाभो ही सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

गेली २५ वर्षे संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थांची कार्यालये समर्थपणे व सक्षमपणे सांभाळल्याबद्दल श्रीमती मृदुला भांडारकर यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. नंतर सध्या अमेरिकेत वास्तव्याला असलेले 'शतकवीर' श्री पांडुरंग गणपत बर्डे यांना शंभर वर्षे पूर्ण झाली याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. परंतु ते उपस्थित राहू न शकल्यामुळे त्यांच्या वतीने त्यांचे पुतणे श्री. परेश बर्डे यांनी पुरस्कार स्वीकारला. नंतर ज्ञातीतील दोन विद्यार्थी आर्या मोहन सबनीस व विराज विवेक




नाडकर्णी यांनी शिक्षणात वीशेष प्राविण्य मिळवले त्याची माहिती श्री. देवदास नाडकर्णी यांनी उपस्थितांना करून दिली. एज्युकेशन सोसायटी तर्फे खास पारितोषिक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

मध्यन्तरानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे विवाहाची सुवर्णजयंती गाठणाऱ्या ९ जोडप्यांचा व वयाचा अमृतमहोत्सव साजरा करणाऱ्या २४ ज्येष्ठ व्यक्तींचा स्मृतीचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यानंतर कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना सौ. देवकी नाडकर्णी यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली. तसेच ज्ञातीतील हुशार विद्यार्थ्यांनाही त्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

विवाहाची सुवर्णजयंती गाठणाऱ्या जोडप्यातील सौभाग्यवतींना ओटी, खण देताना सौ. स्वाती गुरुदत्त दिवेकर हिने पारंपरिक नऊवारी साडी परिधान करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. श्री. राजीव गायतोंडे यांच्या आभार प्रदर्शनाच्या भाषणाने व राष्ट्रगीताने या हृद्य सोहळ्याची सांगता झाली.

**सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे, माहीम**



## आमगले डॉक्टर्स आमगल्या वासपुशीक (२)

बोर्डी येथील Orchard Resort मधील १०, ११ ऑक्टोबरला ठाणे मंचने डॉ. श्रीधर कुलकर्णी यांच्या सहकार्याने आयोजित केलेले, 'आमगले डॉक्टर्स आमगल्या वासपुशीक' अंतर्गत डॉ. शिवराम नाडकर्णी (डोळ्यांचे) व डॉ. गिरीश लाड (पोटांच्या विकाराचे) तज्ज्ञ या दोन्ही डॉक्टरांचे व्याख्यान अतिशय यशस्वी झाले.

१० तारखेला ठाणे–मुंबईहून आलेल्या सर्वांनी खूप मज्जा केली. अगदी बसमध्ये बसल्यापासून अंताक्षरी खेळलो. रिसोर्टही छान होते, जेवण मस्त होते. संध्याकाळी तर चौपाटीवर फेरफटका मारला, गोळा खाल्ला, नारियल पानी प्यालो. काहींनी उंटाच्या गाडीची मजा घेतली. सूर्यास्त पाहून रिसोर्टवर परतलो. रात्रीच्या जेवणाआधी ठाणे मंचकडून एक मजेशीर प्रश्नपत्रिका सर्वांना सोडवावयास दिली. यावेळेला कोणी copy करू नये म्हणून अम्ही नजर ठेवून होतो. सौ. सुहास नाडकर्णी व सौ. शैलजा पै यांनी पहिला नंबर पटकाविला. सौ. आशा नाडकर्णी यांच्या हस्ते त्यांना चॉकलेट देण्यात आले. सौ. विजू कानविंदे व श्री. प्रसाद देसाई यांनी छान गाणी सादर केली. श्री. सुधीर कानविंदे यांनी विनोद सांगितले. श्री. देवदास नाडकर्णी यांनी कथा सांगितली. अशातऱ्हेने सर्वांनीच पहिल्या दिवशी बालपणाचा आनंद लुटला.

दुसऱ्या दिवशी मात्र दोन्ही डॉक्टर्सनी आम्हाला आमच्या वयाची आठवण करून दिली. डॉ. शिवराम नाडकर्णी यांनी पन्नाशीनंतर घेण्याची डोळ्यांची काळजी तर डॉ. गिरीश लाड यांनी वार्धक्यात येणाऱ्या रोगावर २० कडव्यांची स्वरचित कविता वाचून दाखविली. पण गंभीर गोष्ट म्हणजे हे रोग सध्या ३० – ३५ वर सुरू व्हायला लागले आहेत असे ते म्हणाले.

डॉ. शिवराम नाडकर्णी (प्रसाद) स्वत: screen घेऊन आले होते. Computer च्या साहाय्याने त्यांनी अतिशय सुंदररीत्या presentation केले. सर्वसाधारणपणे व वयपरत्वे मधुमेह, डोळ्यांना होणाऱ्या जखमा (खेळांमुळे, पडण्यामुळे) यांचा डोळ्यांवर होणारा परिणाम छान सांगितला तसेच मोतीबिंदू झाल्यावर कोणते उपचार, ऑपरेशन आताचे, पूर्वीचे, त्यातील फायदे – तोटे व्यवस्थित समजावले. तसेच glucoma मध्ये high pressure मुळे blood circulation वर परिणाम होतो व मोतीबिंदू मध्ये डोळ्यात सुधारणा होते तशा glucoma त अंधत्व येण्याची शक्यता जास्त असते. diabetic पेशंटमध्ये रक्तात साखर जास्त असते. पण जिथे पाहिजे तिथे ती पोचत नाही. असे ते म्हणाले. डॉक्टर्सनी slide show मधून सर्व तऱ्हेच्या शस्त्रक्रिया कशा करतात त्याची यथासांग माहिती दिली. आमच्या डोळ्यांची काळजी कशी घ्यावी ह्याचे ज्ञानामृत दिले.

डॉ. गिरीश लाड पोटाच्या विकारांवर बोलायला आले होते. सर्जरीचे शिक्षण त्यांनी



डॉ. सदानंद नाडकर्णी यांच्याकडे घेतले होते. पोटांच्या विकारांची त्यांनी सविस्तर माहिती दिली. पोटदुखी, उलटी, loose motion किंवा no motion, भूक न लागणे इत्यादी लक्षणे तसेच पोटदुखीचे प्रकार – जबरदस्त पोट दुखणे, जेवायच्या आधी, नंतर शिवाय साईडला किंवा पाठीच्या बाजूला दुखणे असे बरेच प्रकार असल्याचे ते म्हणाले. Acute आणि chronic पोटदुखीमधील फरक त्यांनी सांगितला. बेंबीच्या आजुबाजुला ९ quadrants (भाग) असतात व डॉक्टरांनाच नेमके कुठे व कशाने दुखते ते कळते असे सांगत patient ची पहिली history माहीत करून घेतल्याशिवाय डॉक्टरांनी निदान करू नये असेही ते म्हणाले. याचबरोबर शरीर स्वास्थ्यासाठी अध्यात्म–साधना महत्त्वाची असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

अध्यात्म म्हणजे काय तर अधि+आत्म. आपल्या आत्म्याला, स्वत:ला, शरीराला ओळखणे, जाणून घेणे. दोन्ही डॉक्टरांनी अतिशय सोप्या, सुंदर शब्दांत आम्हाला आमच्या शरीराचे ज्ञान दिले, भान दिले. सर्वांनी डॉक्टर्सना मनापासून दाद दिली.

– **मंजिरी मनोज कुलकर्णी**, ठाणे

## मुंबई मंच - कारवारी मेळाव्याचे आमंत्रण

**'कारवारी खाद्यमेळाव्याला'** दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय** : रविवार ३१ जानेवारी २०१६ संध्याकाळी ५.०० ते ९.००
**कार्यस्थळ** : सरस्वती बाग, जोगेश्वरी, के.जी एस. सोसायटी पटांगण
**आकार** : रु. ७०० एका गाळयासाठी
**संपर्क** : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी. **(रात्री ७ ते १०)**

**रसिका गायतोंडे : ९९६१७४४४०१ राजू बोरकर : ९८२०९१७८४१**

**संपर्कासाठी अंतिम तारीख** : २० जानेवारी २०१६

प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य
किस्मूर, एरप्पे, सुकरुंडे, हीट, पातोळी इत्यादींवर ताव मारण्यासाठी
सर्वांनी मोठया संख्येने हजर राहावे.

## *एक अनुभव ! पटला तर त्याचा फायदा घ्या !!*
## *नाहीतर..........!*

माझे वडील श्री. भास्कर दत्तात्रय कसबेकर रिझर्व बँक ऑफ इंडियामध्ये मोठ्या हुद्यावर होते. त्यांच्या कलकत्ता, मद्रास, हैदराबाद अशा बऱ्याच ठिकाणी वारंवार बदल्या होत असत. मुलांच्या शिक्षणाचा बोजवारा उडू नये म्हणून मला व माझा धाकटा भाऊ जयंतला कारवारला आजी–आजोबांकडे ठेवले होते. कारवारच्या हिंदू हायस्कूलमधून मी १९५४ मध्ये एस्.एस्.सी परीक्षा चांगल्या मार्कांनी पास झालो.

आमचे आजोबा श्री दत्तात्रय रामचंद्र कसबेकर अतिशय कडक शिस्तीचे व जमदग्नीचे अवतार समजले जात. मी आजोबांच्या हाताचा खूप मार खाल्ला आहे. तरीपण अगदी मनापासून सांगतो, आजवर मी काही आयुष्यात थोडाफार यशस्वी झालो असेन तर त्याचे सर्वात जास्त श्रेय परमप्रिय आजोबांनाच आहे! असो!!

आम्ही कारवार-मुंबई प्रवासात आजी–आजोबांबरोबर हॉटेलमध्ये एखादा चहा–डोसा वगैरे खाल्लेला असेल पण एस्.एस्.सी पूर्ण होईपर्यंत मी कधी स्वतः एकट्याने हॉटेलात चहा सुद्धा प्याल्याचे मला आठवत नाही.

**आता माझ्या रोमांचक अनुभवाबद्दल सांगतो :–**

१९५४ मध्ये मी १६ वर्षाचा असताना मला विडी ओढायची खूप इच्छा झाली. केवळ कुतुहल म्हणून! घाबरत घाबरत बाजाराच्या एका कोपऱ्यात बसलेल्या अगदीच मामुली विक्रेत्याला दोन पैशाची विडी द्यायला सांगितली.

विक्रेता : अरे! तू खारगेदत्तमामांचा नातू नारे? विडी ओढतोस, थांब तुझ्या आजोबांना सांगतो.

मी : तू धंदा करायला बसला आहेस का लोकांच्या चहाड्या?

मी आणखीन दोन ठिकाणी असेच निष्फळ प्रयत्न केले.

**तुम्ही मला सांगा असे दुकानदार या काळात तुम्हाला आता कारवारांत तरी सापडतील कां? असे दुकानदार, ज्यांना विद्यार्थ्यांच्या नीतिमत्तेची स्वतःच्या धंद्यापेक्षाही जास्त चाड आहे? शक्यच नाही!**

मी पण हट्टालाच पेटलो होतो. नाईलाजाने रस्त्यावरची ३–४ सिगारेटची थोटके जमा केली व घरी ''माडी''वर जाऊन त्यातली तंबाखू काढली व कागदांत घालून सिगारेट सारखी सुरळी तयार केली व पेटवली. पण आमच्या आजीचे (कावाका) नाक खूप तीक्ष्ण! स्वयंपाकघरात तिला कसा वास आला कोण जाणे. हळूच मांजराच्या पावलाने ती माडीवर आली आणि मी पकडला गेलो. नशीब तिने ही गोष्ट आजोबांना सुनावली नाही. नाहीतर...

१९५६ मध्ये Inter Science ची परीक्षा संपल्यावर मी इंदूरला माझ्या मावशीकडे (सौ. मालती सीताराम कसबेकर) माझ्या मामाबरोबर (श्री. भालचंद्र जगन्नाथराव मुजुमदार) सुट्टीत राहायला गेलो होतो. ती. भावोजी (श्री सीताराम महाबळेश्वर कसबेकर) त्यांची ३ मुलं – सुहास, गौतम आणि



विक्रम. मी आणि मामा, भावोजीच्या कारमधून ''महूला'' सहलीला गेलो होतो. वाटेत भावोजींनी आपले सिगारेटचे पाकीट काढले व मी नको नको म्हणत असताना माझ्या व मामांच्या हातात एक एक सिगारेट कोंबली. १८ वर्षे पूर्ण झाल्यावर मला सिगारेट ओढण्याची पूर्ण मुभा आहे असे सांगून मला माझ्या हक्काची त्यानी जाणीव करून दिली. अधुनमधून मागे बसलेल्या तिन्ही मुलांना (सर्वांची वयं १० वर्षांच्या आंत)– घ्या रे एक–एक झुरका, मजा करा व त्यांना अतिआग्रह करून जवळजवळ जबरदस्तीने एक–एक झुरका घ्यायला लावला. तिघेही आत घेतलेल्या धुराने कासावीस झाले व मोठ्याने खोकायला लागले. घरी गेल्यावर आईला सांगतो की बाबांनी जबरदस्तीने आम्हाला सिगारेट ओढायला लावली असा त्यांनी भावोजींना दम पण दिला.

मित्रहो! आज सुहास इंदूरमध्ये एक मोठा Tax Consultant आहे. गौतम एक यशस्वी M.D. Doctor आहे आणि विक्रम एक IIT Scholar असून Hero (पूर्वीची Hero Honda) कंपनीत बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या खालोखाल No.1 ऑफीसर आहे व **आज तिघेही सिगारेट ओढत नाहीत.** तेव्हाच माझ्या लक्षात आले की, सीतारामभावोजी एक फक्त यशस्वी Chartered Accountant च नव्हते तर एक जबरदस्त Born Psychiatrist पण होते.

मी सीतारामभावोजींचा हा प्रयोग माझ्या मुलांवरही केला. मी स्वतः ''ड्रिंक्स'' घेताना माझा मुलगा अतुल व मुली – लीना, प्रिती आणि सारीका यांना एक–एक घोट घ्यायचा आग्रह केला. सर्व मुलं मला एकाच सुरांत म्हणाली/किंचाळली– ''इतकं घाणेरडे पेय पपा तुम्ही कसे घेता?'' जवळ बसलेल्या बायकोला मी ताबडतोब सांगितले– बघ मुलं काय म्हणतात! आणि तुला वाटते मी enjoy करत आहे. अग! स्वतः हे त्रास भोगल्याशिवाय यश मिळत नाही.

**Jokes apart ! पण आज माझी चारी मुलं बऱ्यापैकी Successful असून सुद्धा Hard liquor अजिबात घेत नाहीत.**

माझे अगदी स्पष्ट मत आहे की, ५ ते १० वर्षा दरम्यान मुलांना मुद्दाम एखादा सिगारेटचा झुरका व तसेच व्हिस्की–खास करून बिअरचा घोट घेण्यास जरूर आग्रह करून बघा. मी सांगतो या दोन्ही प्रकारांची एकतर त्यांच्या मनात इतकी घृणा आणि शिसारी निर्माण होईल, शिवाय तुम्ही स्वतःच आग्रह केल्यामुळे कुठल्याही प्रकारची अपराधी भावना किंवा कुतूहलाचा भागही राहणार नाही व ती निश्चितच या व्यसनांपासून कायमची दूर राहतील आणि ते सुद्धा स्वेच्छेने. कडक शिस्तीत वाढलेला मी भरपूर सिगारेट व दारु प्यायला शिकलो आणि कुठल्याही प्रकारचे निर्बंध न घातल्यामुळे व खास करून वरील प्रयोगांमुळे माझी मुले या व्यसनांपासून पूर्णपणे अलिप्त राहिली.

यावरून काय बोध घ्यायचा तो तुम्हीच घ्या.

**– अरुण भास्कर कसबेकर : ९८२०२९१३६५**

(श्री. कसबेकर यांच्या वरील लेखावरचे स्पष्ट अभिप्राय जरूर कळवा.
योग्य वाटल्यास त्यांस प्रसिद्धी दिली जाईल. – संपादक)

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| प्रियांका प्रवीण पिकळे, जोगेश्वरी | व | मलय वर्मा, मुंबई |
| श्रीया प्रकाश कुलकर्णी, पुणे | व | अनीश विहंग बेन्द्रे, पुणे |
| ऊर्मी गिरीश रेगे, नाशिक | व | मंगेश अनिल परुळकर, मुंबई |
| स्नेहा सुधीर वाघ, सदाशिवगड | व | धीरज दयानंद प्रभुदेसाई, पैंगिणी |
| सर्वेश महाबळेश्वर वागळे, माहीम | व | प्रीती मंगेश पाडगांवकर, गोरेगांव |

**दि एन्. के. जी. एस्. बी. इंडस्ट्रीयल अँड एज्युकेशन सोसायटी**
**२०१५-२०१८ कालावधीसाठी नवी कार्यकारिणी**

कार्याध्यक्ष : **देवदास अ. नाडकर्णी**
कार्योपाध्यक्ष : **विवेक सु. कुलकर्णी**
कार्यवाह : **मंगेश भा. पालेकर व गीता बह्मेश संझगिरी**
खजिनदार : **अरविंद वा. भट व गणपती म. नाडकर्णी**
सभासद : **प्रदीप नी. देसाई , राजीव दि. गायतोंडे व नंदिता प्र. शेटगिरी**

**ठाणे मंच वधूवर सूचक मंडळ**
**जोगेश्वरी शाखाप्रमुखपदी बदल**
**www. nkgsbmatrimony.com**


मंडळाच्या जोगेश्वरी शाखेची सुरुवातीपासून कित्येक वर्षे समर्थपणे धुरा सांभाळणाऱ्या प्रमुख श्रीमती तारा गायतोंडे यांनी वैयक्तिक कारणास्तव यापुढे काम करण्याची असमर्थता व्यक्त केली आहे. आता नवीन शाखाप्रमुख खालीलप्रमाणे

**सौ. अनुजा शंकर (दिनेश) नाडकर्णी** (बीना सबनीस)
११ डी, सरस्वती बाग, रामेश्वर मंदिराजवळ, जोगेश्वरी (पूर्व)
(०२२-२८३६९२९९, ९९२००३३६०६) संध्याकाळी ७ नंतर
**सुरेश पालेकर ९९६९४५५३७०, मंजिरी कुलकर्णी ९६६५०९८११७**




www.kccgoa.in

कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**
मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर,
**मंगेशी, फोंडा- गोवा**

प्रोजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

फ्लॅट्स् उपलब्ध: १ रुम किचन, १ बी.एच्.के, २ बी.एच्.के

a Project by:
**कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**
मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टलि:2683 3841/47/72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिस: टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा
saadadvertising.com

## निस्पृह ट्रेड युनियन लीडर कॉ. बाळकृष्ण(मनोहर) धुमे यांची जन्मशताब्दी

'निस्पृह' ट्रेड युनियन लीडर म्हणजे 'सफेद' कोळसा असे म्हणण्यासारखा विरोधाभास. त्याला अपवाद म्हणजे सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे राहणारे कॉम्रेड बाळकृष्ण(मनोहर) शांताराम धुमे. आजच्या इतका नसला तरीही ट्रेड युनियन क्षेत्रात त्यावेळीही भ्रष्टाचार बोकाळला होता. गुंडगिरी, दहशतवाद, वाममार्गाने संपत्ती कमावणे इत्यादी अपप्रवृत्ती तेव्हांही चांगल्या सोकावल्या होत्या. पण धुमे यांनी कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी केवळ लोकशाही मार्गाचाच अवलंब केला. गुंडगिरी, दहशतवाद यांच्या वाऱ्यालाही ते उभे राहिले नाहीत व कधीही पैशाची लाच घेतली नाही. अशा या निस्पृह नेत्याचा ३१ डिसेंबर २०१५ हा जन्मशताब्दीदिन त्यानिमित्त हा त्यांचा अल्प परिचय.

धुमे यांचा जन्म बाडमधला. घरची गरीबी. १९३२ साली कारवारहून मॅट्रीक होईपर्यंत चार वर्षे त्यांना आपल्या एज्युकेशन सोसायटीकडून आर्थिक साहाय्य मिळत असे. नंतर मुंबईत येऊन व्हीजेटीआयमधून इंजिनीअरींगचे शिक्षण घेतले. गरीबीतून वर आल्यामुळे त्यांना कामगारांचे कष्टप्रद जीवन जवळून बघायला मिळाले. त्यामुळे ते लाल बावट्याकडे आकर्षित झाले. भारतीय कम्युनिस्ट पक्ष व आयटक ही कामगार संघटना उभारण्याच्या कामात त्यांचा सिंहाचा वाटा होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठीही धुमे सक्रीय होते.

महिंद्र ॲंड महिंद्र कामगारांना संघटीत करून केवळ पगारवाढ व बोनस हे एकमेव उद्दिष्ट समोर न ठेवता कामगारांसाठी त्यांनी कल्याणकारी योजना राबविल्या. तेथील कामगार संघटनेचे ते तब्बल ४५ वर्षे सरचिटणीस होते. महिंद्र युनियनच्या ४५०० कामगारांच्या ४५० प्रतिनिधींच्या भरगच्च सभेने सात लाख रुपयांचा (त्या वेळचा) निधी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना देण्याचा ठराव एकमुखाने मंजूर केला होता. पण तो निधी स्वीकारण्यास त्यांनी नम्रपणे नकार दिला. काय ही निस्पृहता! फॅक्टरीचे मालक केशब महेंद्र पण धुमे यांना त्यांच्या सच्चेपणाची दखल घेऊन त्यांना मानाची वागणूक देत. त्यांच्या सच्चेपणाचे आणखी एक उदाहरण म्हणजे ते युनियनने ड्रायव्हरसह दिलेली कार फक्त युनियनच्याच कामासाठी वापरत. मुलांना शाळेत सोडण्यासाठी वगैरे कधीच नव्हे. त्यांच्या कन्या विद्या धुमे स्वतःच्या व्यवसायासाठी कुणालाही भेटायला गेल्या तर 'एक सच्चे आदमी की लडकी' म्हणून त्यांनाही मानाची वागणूक मिळते.

१६ डिसेंबर २००० रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. सरस्वती बागेतील 'सुंदर निवास' येथून त्यांची अंत्ययात्रा फुलांनी सजविलेल्या ट्रकमधून काढली. त्यावेळी प्रचंड जनसमुदाय लोटला होता. यावरून त्यांची लोकप्रियता दिसून येते.




## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

*मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या सुमारे ५० संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.*

*उद्दिष्ट : सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञातिबांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.*

संपर्क :

**न. अ. जोशी** : २६३०४५९९ / ९८१९३०४५९९

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफिस, अंधेरी, मुंबई-४०००५३.

SOCIETY SERVICE RESOURCE

## प्रतिक्रिया
### निर्मळ मनाच्या निर्मलाबाई वाघ

गेल्या अंकात सौ. वृंदा बोरकर दळवी यांचा निर्मला वाघबाईंवरचा श्रद्धांजली लिहिलेला लेख वाचला आणि वाघबाईच्या व्यक्तिमत्वाच्या पैलुंचे अजून काही पदर उलगडून दाखवावे असं मनापासून वाटलं. वाघबाई आणि वृंदा बोरकरबाई या दोघींनीही मला नववी, दहावी-अकरावीला विज्ञान उत्तमरीत्या शिकवलं. विद्यार्थिनी असताना आमच्यासाठी असलेल्या वाघबाई, मी त्याच शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाल्यावर आमच्या निमाताई झाल्या. पूर्वीच्या 'बाई' या भीतीयुक्त नात्याचं, मी त्यांची सहशिक्षिका झाल्यावर आदरयुक्त मैत्रीच्या नात्यात रूपांतर झालं. पूर्वी बाई असताना कडक वाटणाऱ्या वाघबाईंचं प्रेमळ अंत:करण, त्या निमाताई झाल्यानंतरच प्रत्ययास आलं.

वाघ आणि आमच्या तेलंग घराण्यांचे फार पूर्वीपासूनचे मैत्रसंबंध होते. माझे आजोबा रा.ब. तेलंग आणि निमाताईचे ज्येष्ठ चुलते सुप्रसिद्ध शिल्पकार श्री. विनायकराव वाघ यांची घनिष्ट मैत्री होती. त्याच्या पुढील पिढीतील निमाताई आणि माझी मैत्री केवळ हिन्दू हायस्कूलमुळे झाली. निमाताईंचे वडील वामन डॉक्टर आमचे फॅमिली फ्रेंड आणि फॅमिली डॉक्टरही होते. त्यांना आम्ही पंडितकाका म्हणत असू. माझी चुलत आत्या वाघ घराण्यातील स्नुषा झाली आणि दोन्ही घराण्याचे नातेसंबंध अधिक दृढ झाले.

निमाताईंचा स्वभाव अत्यंत पारदर्शी होता. साधेपणा, सरळपणा, सच्चेपणा, समंजसपणा, स्पष्टवक्तेपणा आणि (विचारांचा) सखोलपणा या सहा सगुणांचं रसायन म्हणजे निमाताई होत्या. द्वेष, मत्सर, असूया, दुस्वास या माणसामध्ये थोड्या-बहुत प्रमाणांत असणाऱ्या अवगुणांचा लवलेशही त्यांच्यामध्ये नव्हता यामध्ये य:किंचित अतिशयोक्ती नाही. आंत एक बाहेर एक असं दुटप्पी नाटकी वर्तन करणाऱ्यांची त्यांना प्रचंड चीड येई. त्या तल्लख बुद्धीच्या होत्या. विज्ञानाच्या पदवीधर असल्या तरी संस्कृत, इंग्लीश, मराठी, हिंदी हे भाषा विषयही व्याकरणदृष्ट्या यांना चांगलेच ज्ञात होते.

विज्ञान त्या समरसून शिकवत. आकाशमंडळातील ग्रह-ताऱ्यांचे दर्शन घडवण्यासाठी त्या विद्यार्थ्यांना रात्री ११-१२ नंतर शाळेच्या मागील पटांगणात बोलवत असत. तासन् तास प्रतीक्षा झाल्यानंतर टेलिस्कोपमधून नभांगणातील विलोभनीय ग्रहांचं दर्शन आम्हाला घडलं ते केवळ निमाताईचा उत्साह आणि चिकाटीमुळेच!

अतिशय गोड आवाजाची देवदत्त देणगी लाभलेल्या निमाताईंना संगीत शिक्षण न घेताही सूर - ताल - लय - सम यांची पक्की जाण होती. त्या गात असलेल्या मीरेच्या भजनाचे सूर आजही कानात घुमतात. बऱ्याच वर्षापूर्वी त्या म्हापशाला माझ्या घरी आवर्जून आल्या होत्या



२-३ वर्षापूर्वी त्या गोव्याला मेधा बाडकरकडे मुक्कामास होत्या तेव्हां मी, शशी बोरकर वगैरे दोन वेळा त्यांच्या भेटीसाठी गेलो. काठी घेऊन पाय ओढत चालणाऱ्या कृश निमाताईंना पाहून आम्हाला धक्काच बसला. दोन्ही दिवशी जुन्या हिन्दी-मराठी गाण्यांची मैफल आम्ही जमवली होती. त्या गाऊ शकल्या नसल्या तरी पेटीवर चुकणारा सूर त्या अचूक दाखवून देत. सर्वांच्या भेटीने त्या खूप खूप सुखावल्या होत्या. त्या भरगच्च वातावरणातून पुन्हा वृध्दाश्रमात जाणं त्यांना नकोसं वाटत होतं. आज ते सारे आठवून खूप वाईट वाटतं.

त्यांच्यामधील सुहृदयता अनेक प्रसंगातून प्रत्ययास येई. आंधळे-पांगळे-लुळे दृष्टीस पडले की त्या म्हणायच्या,' बिच्चारे ते! आपण किती सुखी आहोत ग ! देवाने आपल्याला हात पाय आणि इंद्रियं धड दिलीत हे केवढं मोठं वरदान आहे आपल्यासाठी !' त्याचप्रमाणे विद्यार्थीदशेत आम्ही बेअक्कल मुलं वेड्यांच्या विचित्र हावभावांना हसल्यावर त्या गंभीर होत म्हणत,' त्यांना असं हंसायचं नसतं. ते स्वतःच्या खुशीने थोडेच वेडे झालेत ? परिस्थितीने त्यांना वेडं बनवलंय' माणसंच नाहीत तर पशू,पक्षी, वनस्पतीं बद्दलही त्यांना आपुलकी वाटे.

नावाप्रमाणेच निर्मळ असलेल्या निमाताईंसारखी साधी सरळ माणसं या बेगडी जगांत दिसणं दुरापास्तच झालंय. अशावेळी असा एक केविलवाणासा विचार मनात डोकावतो की, मरणोत्तर देहदान करून गरजूंना उपयोगी पडलेल्या निमाताईंचं अतिप्रामाणिक, स्वच्छ, उदात्त आणि निर्मळ असं मनही मृत्योत्तर दान करण्याची सुविधा उपलब्ध असती तर....???

**-सौ. मीरा तेलंग प्रभूवेर्लेकर**, गोवा - ९१७५२०१८०२ / ९४२०२४२३९६

### श्रीमती नंदिनी बाबुराव नाडकर्णी यांचे देहावसान.

माहीम येथे राहणाऱ्या नंदिनी नाडकर्णी म्हणजे कर्तव्यदक्ष गृहिणी, समाजसेविका, लेखिका, उत्कृष्ट वक्त्या, कुशल प्रशासक अशा बहुरंगी व बहुढंगी व्यक्तिमत्वाचे प्रतीक. त्यांनी लिहिलेल्या लघुकथा अनेक मासिकांत प्रसिध्द झाल्या आहेत. शिवाजी पार्क येथील'वनिता समाज' या प्रथितयश संस्थेशी त्या निगडीत होत्या. वाचनालय, करमणूक शाखा, जीवन विकास, व्यक्तिमत्व सुधार, इमारत दुरुस्ती अशा विविध उपक्रमात त्यांचा मोलाचा वाटा असे. त्यांच्या हसतमुख, उत्साही मिश्किल स्वभावामुळे व पसन्न व्यक्तिमत्वामुळे त्या मुंबईतील सर्व महिलामंडळांमध्ये अत्यंत लोकप्रिय होत्या. २००४ साली संघाने त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करून घेतले व त्या वर्षीच्या स्नेहसमेलनात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता.

नंदिनीताईंचे ३ ऑक्टोबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात संघही सहभागी आहे.


# निधन

| | | |
|---|---|---|
| अरविंद कृष्णराव देसाई | (कडवाड) | अमेरिका |
| वसंत बाळकृष्ण गायतोंडे | (काणकोण/कारवार) | बोरीवली |
| वासुदेव शांताराम गायतोंडे | (हळगे) | माहीम |
| इंदिरा रामचंद्र कामत<br>(पूर्वाश्रमीच्या विठाबाई शांताराम कसबेकर) | (कडवाड) | ठाणे |
| रमाकांत महेश्वर कसबेकर | (कडवाड) | चेन्नई |
| अरुण वैकुंठ कसबेकर | (कडवाड) | पुणे |
| प्रभाकर दिनकर कुलकर्णी | (हळगे) | ऑपेराहाऊस |
| सीमा (सुधा) विनायक (सदानंद) कुलकर्णी | (अवर्सा) | बोरीवली |
| आशा (वत्सला) अशोक नाडकर्णी | (सांवरपै) | बंगळूर |
| अनसूया प्रभाकर नाडकर्णी | (सांवरपै) | कारवार |
| शिवानंद शेषगिरी नाडकर्णी | (अगळी) | अगळी |
| सुजला प्रकाश फाटक<br>(पूर्वाश्रमीच्या सुजला महेश्वर वाघ) | (सदाशिवगड) | पारले |
| अंबाप्रसाद (प्रसाद) बाळकृष्ण पालेकर | (तोडूर) | अंधेरी |
| सुहासिनी रत्नाकर पै<br>(पूर्वाश्रमीच्या सुहास परमानंद सोहोनी) | (गावगेरी) | जोगेश्वरी |
| अशोक रामचंद्र रामाणी | (व्हडले बाग) | जोगेश्वरी |
| *राधाबाई (कुसुम)हणमंत सुखटणकर | (सुपे) | बोरीवली |
| गिरीश मंगेश (गुणा) तेलंग | (केरवडी) | पुणे |
| नेहा नरेंद्र तेलंग | (बाड) | बंगळूर |
| दुर्गादत्त(अरुण)महेश्वर तेलंग | (बाड) | माहीम |
| सुधा जनार्दन वाघ | (सदाशिवगड) | खार |
| प्रभा विश्वंभर वाघ | (सदाशिवगड) | अंधेरी |
| सुधा अनंत वाघ | (सदाशिवगड) | सांताक्रुज |
| अच्युत काशिनाथ वाघ | (सदाशिवगड) | जोगेश्वरी |

*** राधाबाई यांचे निधनसमयी वय वर्षे ९८ होते व एज्युकेशन सोसायटीच्या त्या सर्वांत जुन्या सभासद होत्या.**




# आपल्यासाठी भक्तीचा एक स्वर्णिम अनुभव !



## श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहालसा आणि श्रीनागेश

**यांच्या फायबरच्या मूर्ती टिकाऊ सोन्याच्या प्लेटिंगसह उपलब्ध**

वास्तुशास्त्राप्रमाणे घडविलेली 'तोरणलक्ष्मी'
तसेच गणेश, लक्ष्मी, सरस्वती आणि कुबेर यांच्या
मूर्तीसुध्दा उपलब्ध आहेत.

संपर्कः
चंद्रशेखर सुनील खांडाळेकर, जे/६ शारदाश्रम, भवानीशंकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२८
फोन - ९८१९५ २३५५१ / ९८६७३ ५१६७३
facebook page-Holygold

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

**श्रीमती विमलाबाई मुझुमदार यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी संघाला एक लाख रुपयांची देणगी**

'मेसर्स बोरकर अँड मुझुमदार' ही सुप्रसिद्ध ऑडिट कंपनी समस्त ज्ञातिबांधवांच्या माहितीची आहे. आपल्या संघाला व एज्युकेशन सोसायटीला ही कंपनी गेली कित्येक वर्षे विनामूल्य सेवा देत आहे. या कंपनीच्या आद्य संस्थापकांपैकी एक कै. माधव महेश्वर मुझुमदार यांच्या पत्नी व सध्याचे एक भागीदार श्री. दिलीप मुझुमदार यांच्या मातोश्री श्रीमती विमलाबाई यांचा २५ ऑक्टोबर २०१५ हा जन्मशताब्दीदिन. या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ श्री. दिलीप व कुटुंबीयांनी संघाच्या समाजसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. पांडुरंग (नरहरी) वाघ यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी**

गेल्या पिढीत श्री. पांडुरंग विनायक वाघ ऊर्फ नरहरी वाघ कोंकणी साहित्यात विशेष रुची घेणारे एक रसिक होऊन गेले. सध्याच्या मुखपत्रिकेचे वडील भावंड 'शारदा' या त्रैमासिकाच्या संपादक मंडळावर १९३८-१९४० दरम्यान ते कार्यरत होते. 'शारदा'मध्ये कोंकणी कविता, ग्यादी, लेख वगैरे साहित्य असे त्याचे ते संपादन करीत असत. १९३५ साली मुंबई येथील कोंकणी साहित्य संघामार्फत 'वोंवळा' हे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. त्यातील सर्वच्या सर्व १४ लेख हे कारवारकर ज्ञातिबांधवांचेच होते. त्यांत 'नरहरी' या टोपण नांवाखाली त्यांचा 'गरीबालो संसार' हा एक लेख होता.

श्री. वाघ यांचा २९ ऑगस्ट २०१५ हा जन्मशताब्दी दिन. या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या सौ. नीला दिलीप मुझुमदार व कुटुंबीयांनी एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्रीमती लक्ष्मीबाई (सरस्वती) जगन्नाथ मुझुमदार यांच्या पहिल्या पुण्यतिथीप्रसंगी संघाला ५०,००१ रुपयांची देणगी**

कारवार येथील गेल्या पिढीतील सर्वांच्या परिचयाचे डॉ. कमलाकर मुझुमदार यांच्या स्नुषा श्रीमती लक्ष्मीबाई (सरस्वती) जगन्नाथ मुझुमदार यांचे गेल्या वर्षी सांताक्रुज (प.) येथे २२ सप्टेंबर २०१४ रोजी निधन झाले. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या श्रीमती सुमेधा (सुबोध) व जामात श्री. एम्. के. जयप्रसाद यांनी संघाच्या समाजसेवानिधीसाठी ५०००१ रुपयांची देणगी दिलेली आहे.



## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. रामदास काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सिंधू यांजकडून | १,१०१ |
| २ | श्रीमती उमाबाई विश्वनाथ दळवी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुत्र श्री. मारुती व स्नुषा श्रीमती सुधा यांजकडून | ५,००० |
| ३ | पितृपक्षानिमित्त अनामिकेकडून | १,००१ |
| ४ | श्रीमती मालती व श्री. नीलकंठ भवानीशंकर धुमे यांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त पुत्र श्री. चंद्रशेखर यांजकडून | १,००० |
| ५ | श्रीमती लक्ष्मीबाई (सरस्वती) जगन्नाथ मुझुमदार यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती सुमेधा (सुबोध) व जामात श्री एम्. के. जयप्रसाद यांतकडून | ५०,००१ |
| ६ | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ७ | श्रीमती विमलाबाई माधव मुझुमदार यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र श्री. दिलीप व कुटुंबीयांकडून | १,००,००० |
| ८ | श्री.मोहन शांताराम कसबेकर यांच्या स्मरणार्थ अनामिकेकडून | १,००१ |
| ९ | श्रीमती यमुनाताई, सपाताई व सिंधूताई ह्या बहिणींच्या स्मरणार्थ भाऊबीजेनिमित्त बंधू श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून | ३,००३ |
| १० | श्रीमती सरोजिनी अंबिकाचरण बोरकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. शिवानंद यांजकडून | ५,००० |
| ११ | श्री.घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,००१ |
| १२ | सौ. शरयू व श्री दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांच्या विवाहाच्या सुवर्ण जयंती प्रसंगी सौ. सुरेखा व श्री. जयंत नागेश नाडकर्णी यांजकडून | १०,००० |

### वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती सुनंदा विनायक मुझुमदार यांच्या पुण्यतिथी प्रसंगी बहीण श्रीमती मेधा विनायक मुझुमदार यांजकडून | १,००० |
| २ | श्रीमती सरोजिनी अंबिकाचरण बोरकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. शिवानंद यांजकडून | ५,००० |

### वृद्धसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मोहन वसंत कसबेकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती उषा, पुत्र श्री. संदीप व स्नुषा श्रीमती नेहा यांजकडून | ११,००० |
| २ | पितृपक्षानिमित्त भांडारकर कुटुंबीयांकडून | १,००१ |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्रीमती जयश्री (कावा) व श्री. आनंद (आनू) फटबा वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री दिनेश यांजकडून | २५,००० |
| ४ | श्रीमती मीरा व श्री. गोपाल सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र सर्वश्री मिलींद व निमीष यांजकडून | ५००१ |
| ५ | श्री. मनोहर शंकर वागळे यांच्या १६ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. सतीश यांजकडून | २००१ |
| ६ | श्रीमती सरोजिनी अंबिकाचरण बोरकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री शिवानंद यांजकडून | ५००० |
| ७ | श्री भवानी नारायण स्थळेकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती उर्सुला (तारा) यांजकडून | २५,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती मंगला देवीदास मानगे यांच्या स्मरणार्थ पती श्री देवीदास केशव मानगे यांजकडून | ५००० |
| २ | डॉ. वैशाली विद्याधर कुलकर्णी यांजकडून | ५००० |
| ३ | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त अनामिकेकडून | १००१ |
| ४ | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १००१ |
| ५ | श्री. पांडुरंग (नरहरी) विनायक वाघ यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी कन्या श्रीमती नीला दिलीप मुझुमदार व कुटुंबीयांकडून | १,००,००० |
| ६ | श्रीमती विमलाबाई माधव मुझुमदार यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी कन्या श्रीमती शालिनी मनोहर नाडकर्णी यांजकडून | २५,००० |
| ७ | श्रीमती सरोजिनी अंबिकाचरण बोरकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. शिवानंद यांजकडून | १०,००० |
| ८ | श्री घनश्याम गोपाळ वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १००१ |


## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १ | श्री मोहन संजगिरी, अंधेरी | १००१ |
| २ | श्रीमती माधवी मीलन मुझुमदार, अंधेरी | २००१ |
| ३ | श्रीमती रेखा शरद सलगर, ठाणे | १०,००० |
| ४ | श्री. सुमंत मंगेश साखरदांडे, मुलुंड | १०,००० |

(उर्वरीत देणग्यांचा तपशील जागेअभावी पुढील अंकी)



Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.